# बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

क्र.एमपीआर/8598 दि. 10.10.2024

## - सूचनापत्र -

कनिष्ठ लघुलेखक (इं-नि-म) या संवर्गाच्या तात्पुरत्या निवडयादीमधील उमेदवारांच्या सर्व मूळ शैक्षणिक प्रमाणपत्रे तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्रांची / कागदपत्रांची पडताळणी करण्यात आलेल्या तसेच, निवडीच्या निकषानुसार, पात्र ठरलेल्या उमेदवारांची **अंतिम निवडयादी** क्र. एमपीआर/8360 दि.23.09.2024 अन्वयेच्या सूचना पत्राव्दारे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/Forprospects /Recruitment/Chief Personnel Officer या संकेतस्थळावर दि. **23.09.2024** रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

कनिष्ठ लघुलेखक (इं-नि-म) या पदावर नियुक्ती करण्यापूर्वी, अंतिम निवडयादीमधील उमेदवारांची वैद्यकीय तपासणी, चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी तसेच, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र पडताळणे आवश्यक आहे

**सबब, अंतिम निवडयादीमधील उमेदवारांनी, सोबत जोडण्यात आलेल्या तक्ता-अ येथे नमूद केलेल्या SELECTION NUMBER नुसार, निश्चित केलेल्या दिनांक व वेळेत, खाली नमुद केलेल्या मूळ कागदपत्रांसह, "प्रमुख कर्मचारी अधिकारी यांचे कार्यालय, सहावा मजला, बृहन्मुंबई महानगरपालिका मुख्यालय, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई - 400 001." येथे सकाळी 10.30 वाजता उपस्थित रहावे.**

सदर दिवशी उमेदवारांना **"वैद्यकीय चाचणी प्रपत्र, चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी पत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र पडताळणी पत्र "** गोपनीय स्वरुपात हस्तपोच देण्यात येईल. वैद्यकीय चाचणी प्रपत्र प्राप्त झाल्यानंतर, उमेदवाराने तक्ता - अ येथे नमुद केलेल्या अंतिम निवडयादीमध्ये नमुद SELECTION NUMBER नुसार "महानगरपालिका वैद्यकीय परिक्षक (शहर) / महानगरपालिका वैद्यकीय परिक्षक (पूर्व उपनगरे) विभाग / महानगरपालिका वैद्यकीय परिक्षक (पश्चिम उपनगरे) विभाग" या ठिकाणी नियोजित वेळेत उपस्थित राहून, वैद्यकीय परीक्षणाची कार्यवाही पूर्ण करावी. त्याचप्रमाणे उमेदवारास देण्यात आलेले **चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी पत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र पडताळणी पत्र** संबंधित विभागास सादर करुन, त्याची पोच या कार्यालयास सादर करावी.

**सोबत आणावयाच्या आवश्यक कागदपत्रांबाबत सूचना :-**

1. उमेदवाराने वैद्यकीय परिक्षणाकरीता नविनतम 06 PASSPORT SIZE PHOTO सोबत आणणे.
2. उमेदवाराच्या जन्माचा मूळ दाखला किंवा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केल्याचे मूळ प्रमाणपत्र सोबत आणणे.
3. उमेदवारांची वैयक्तिक माहिती (उंची , वजन, शरीराची ठेवण, वर्ण, नेत्र वर्ण, वैयक्तिक खूण) सोबत आणणे.
4. जन्मापासून आतापर्यंत रहात्या पत्त्यानुसार स्थानिक पोलिस स्टेशनचे पत्ते आणणे.
5. उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राच्या 03 छायांकीत प्रती आणणे.
6. ज्या उमेदवारांना नियोजित दिनांकादिवशी उपस्थित राहणे शक्य नसेल, त्यांनी **निश्चित केलेल्या दिनांकापूर्वीच** , या विभागास ई-मेलव्दारे कळविणे.
7. उपरोक्त बाबत काही शंका असल्यास दूरध्वनी क्र. 022-22620251 विस्तारीत क्र. 4610, 4626 वर संपर्क साधणे.

| | | |
|---|---|---|
| सही/- दि.10.10.2024 | सही/- दि.10.10.2024 | सही/- दि.10.10.2024 |
| (तेजश्री कांबळे) | (शारदा गोसावी) | (रश्मी खोत) |
| प्रशासकीय अधिकारी (एमपीआर) | सह प्रमुख कर्मचारी अधिकारी (आस्थापना) | प्रमुख कर्मचारी अधिकारी |

## कनिष्ठ लघुलेखक (इं.नि.म) पात्र झालेल्या उमेदवारांचा वैद्यकीय तपासणी तक्ता

| दिनांक | महानगरपालिका वैद्यकीय मंडळ अधिष्ठता बा.य.ल. नायर रुग्णालय व उमेदवारांच्या अंतिम निवडयादीमधील SELECTION NO | वैद्यकीय परिक्षक (शहर) व उमेदवारांच्या अंतिम निवडयादीमधील SELECTION NO | वैद्यकीय परिक्षक (पूर्व उपनगरे) व उमेदवारांच्या अंतिम निवडयादीमधील SELECTION NO | वैद्यकीय परिक्षक (पश्चिम उपनगरे) व उमेदवारांच्या अंतिम निवडयादीमधील SELECTION NO |
|---|---|---|---|---|
| दिनांक 16.10.2024 | अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 1 | पुरुष - सकाळी 10.30 - दुपारी 12.30 स्त्री - दुपारी 2.30- दुपारी 3.30 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 2 - 10 | पुरुष - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 स्त्री - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 11 - 20 | पुरुष - सकाळी 9.00 वाजता स्त्री - सकाळी 9.00 वाजता अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 21 - 30 |
| दिनांक 17.10.2024 | | पुरुष - सकाळी 10.30 - दुपारी 12.30 स्त्री - दुपारी 2.30- दुपारी 3.30 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 31 - 40 | पुरुष - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 स्त्री - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 41 - 50 | पुरुष - सकाळी 9.00 वाजता स्त्री - सकाळी 9.00 वाजता अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 51 - 60 |
| दिनांक 18.10.2024 | | पुरुष - सकाळी 10.30 - दुपारी 12.30 स्त्री - दुपारी 2.30- दुपारी 3.30 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 61 - 67 | पुरुष - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 स्त्री - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 68 - 77 | पुरुष - सकाळी 9.00 वाजता स्त्री - सकाळी 9.00 वाजता अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 78 - 87 |
| दिनांक 21.10.2024 | | पुरुष - सकाळी 10.30 - दुपारी 12.30 स्त्री - दुपारी 2.30- दुपारी 3.30 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 88 - 97 | पुरुष - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 स्त्री - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 98 - 107 | पुरुष - सकाळी 9.00 वाजता स्त्री - सकाळी 9.00 वाजता अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 108 - 117 |
| दिनांक 22.10.2024 | | पुरुष - सकाळी 10.30 - दुपारी 12.30 स्त्री - दुपारी 2.30- दुपारी 3.30 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 118 - 127 | पुरुष - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 स्त्री - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 128 - 134 | पुरुष - सकाळी 9.00 वाजता स्त्री - सकाळी 9.00 वाजता अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 135 - 144 |
| दिनांक 23.10.2024 | | पुरुष - सकाळी 10.30 - दुपारी 12.30 स्त्री - दुपारी 2.30- दुपारी 3.30 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 145 - 154 | पुरुष - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 स्त्री - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 155 - 164 | पुरुष - सकाळी 9.00 वाजता स्त्री - सकाळी 9.00 वाजता अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 165 - 174 |
| दिनांक 24.10.2024 | अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 179 | पुरुष - सकाळी 10.30 - दुपारी 12.30 स्त्री - दुपारी 2.30- दुपारी 3.30 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 175 - 178 | पुरुष - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 स्त्री - सकाळी 10.00 - दुपारी 3.00 अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 180 - 190 | पुरुष - सकाळी 9.00 वाजता स्त्री - सकाळी 9.00 वाजता अंतिम निवडयादीमधील SELECTION NO. 191 - 201 |